K. S. Wani Memorial Trust
# NEWS LETTER
Volume No.10 | July - September 2020 | K. S. Wani Memorial Trust Reg. No.E352

Editorial Committee :
Prof. Dr. Shobha Shinde (Chief Editor)
Ms. Vaishali Songire (Asst. Editor) &
Prof. Mr. Prasad Puranik (Co-Editor)

## Printing Institute News

### मा.डॉ.जगन्नाथ वाणी यांचा जन्मदिवस साजरा



आदरणीय स्व.डॉ. जगन्नाथ वाणी यांचा जन्मदिवस संस्थेचे विश्वस्त मा. श्री. जितेंद्र सोनगिरे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून साजरा करण्यात आला. यावेळी मुद्रण विभाग, बालनेत्र सुरक्षा प्रकल्प व रेऊ वाणी विज्ञान विहार या संस्थांचे सर्व कर्मचारी व पदाधिकारी उपस्थित होते. मा. डॉ. वाणी यांच्या स्वप्नपूर्तीसाठी आपण सगळे प्रयत्नशील आहोत व भविष्यात देखील हे कार्य असेच अविरत सुरू राहील अशा भावना व्यक्त करत विश्वस्त मा. श्री. जितेंद्र सोनगिरे यांनी उपस्थित कर्मचार्यांना मार्गदर्शन करत डॉ. वाणीच्या स्मृतींना उजाळा दिला.

### प्रथम वर्ष डी.पी.ए. वर्गाचा निकाल जाहीर

कोरोना महामारीमुळे विद्यापीठाने रद्द केलेल्या प्रथम वर्षाच्या परीक्षांचा निकाल जाहीर झाला असून प्रथम वर्ष डी.पी.ए. वर्गातून परीक्षेस प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना उत्तीर्ण घोषित करून द्वितीय वर्षात प्रवेश देण्यात आला आहे. परीक्षेत उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठामार्फत गुणपत्रक देखील प्राप्त झाले आहे.

### ७३ वा स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहात संपन्न



कोरोना पार्श्वभूमीवर सर्व नियमांचे पालन करून संस्थेचे विश्वस्थ मा.श्री.जितेंद्र सोनगिरे यांच्या हस्ते ध्वजावरोहण करून ७३ वा स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी देशात अखंड सेवा देत असलेल्या कोव्हीड योद्ध्यांना सलाम करून देशासाठी बलिदान देणाऱ्या क्रांतिकारी देशभक्त व सैनिकांचे स्मरण करण्यात आले. यावेळी का. स. वाणी संस्था, बालनेत्र सुरक्षा प्रकल्प व रेऊ वाणी विज्ञान विहारचे सर्व कर्मचारी व पदाधिकारी उपस्थित होते.

### अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑक्टोबर महिन्यात

कोरोना महामारीमुळे विद्यापीठाने रद्द केलेल्या अंतिम वर्ष डी.पी.ए. वर्गाच्या परीक्षा घेण्याचे न्यायालयीन आदेश विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर माहे सप्टेंबर महिना अखेरीस विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्वानुसार घेण्यात आल्या असून माहे ऑक्टोबर २०२० अखेर विद्यार्थ्यांच्या बहुपर्यायी प्रश्न स्वरुपात लेखी Online परीक्षांचे आयोजन विद्यापीठाने केले आहे त्यासाठी असणारी आवश्यक ती सर्व कार्यालयीन कार्यवाही संस्थेतर्फे पूर्ण करण्यात आली आहे.



## गणेशोत्सवाची परंपरा अखंड

संस्थेत दरवर्षी महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री गणेशाची स्थापना करून सर्व कर्मचारी बांधव गणेशोत्सव साजरा करीत असतात परंतु यावर्षी कोरोना महामारीमुळे सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यात खूप मर्यादा असल्याने संस्थेच्या औद्योगिक वसाहतीत असलेल्या इमारतीत अत्यंत साध्या पद्धतीने श्री गणेशाची स्थापना करून उत्सव साजरा करण्याची परंपरा अखंड ठेवण्यात आली. यावेळी विघ्नहर्त्या श्री गजाननाला कोरोना महामारीत सगळ्यांचे रक्षण करण्यासाठी साकडे घालण्यात

## शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे १०० टक्के प्रवेश पूर्ण

मुद्रण शिक्षण संस्थेच्या पदविका अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्षाचे मंजूर ४० प्रवेश पूर्ण झाले असून २० टक्के वाढीव जागांसाठी विद्यापीठाने मंजुरी दिली आहे वाढीव जागांचे प्रवेश देखील पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. द्वितीय वर्षाचे एकून ५० प्रवेश पूर्ण झाले आहेत. कोरोना महामारीत खूप मर्यादा असताना सुद्धा कोणतीही जाहिरात न देता प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट साध्य करू शकल्यामुळे विश्वस्त मंडळाने समाधान व्यक्त केले आहे.






सी.ए.शशिकांतजी धामणे






## चाळीसगाव एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्तपदी आप्पासाहेब सी.ए. श्री शशिकांत धामणे यांची निवड

का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष आप्पासाहेब सी.ए.श्री शशिकांत धामणे यांची १९०१ साली स्थापन झालेल्या व शतकोत्तर परंपरा असलेल्या खानदेशातील नामांकित आदर्श गुणी विद्यार्थी घडविणाऱ्या चाळीसगाव एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्तपदी अलीकडेच सन्माननीय निवड करण्यात आली आहे. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक चळवळीत सक्रीय असलेले उद्यमशील व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्या कार्याची दखल घेऊन चाळीसगाव एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारी मंडळाने श्री.धामणे यांची योग्य निवड केली आहे. हि निश्चितच गौरवाची बाब आहे. विशेष म्हणजे आप्पासाहेब धामणे हे चाळीसगाव एज्युकेशन संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत. मा. आप्पासाहेबांच्या उल्लेखनीय निवडीबद्दल का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानचे विश्वस्त, पदाधिकारी व कर्मचारी वर्गाकडून मनःपूर्वक हार्दिक

## **Print Olympiad** स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग

ऑल इंडिया फेडरेशन ऑफ मास्टर्स प्रिंटर्स असोसिएशन व पुणे विद्यार्थी गृह संचलीत कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग अंड टेकनॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने ३ सप्टेम्बर २०२० रोजी West zone Print Olympiad स्पर्धेचे Onlineआयोजन केले होते त्यात आपल्या संस्थेतील द्वितीय वर्षाच्या दोन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



Print Olympiad मध्ये सहभागी विद्यार्थी

# बालनेत्र सुरक्षा प्रकल्प

सदर काळात शाळा बंद असल्यामुळे नेत्रतपासणी शिबिर घेण्यात आलेले नाही. तरी या वेळेचा सदुपयोग करीत गेल्या २० वर्षांपासून प्रलंबीत असलेले ग्रंथ मोजणीचे काम तसेच जीर्ण झालेल्या दाखल नोंदवह्यांची (रजिस्टर) संगणकाच्या माध्यमातून नव्याने पुन:नोंद करण्यात आली. मे २०२० ते जुलै २०२० पर्यंत संगणकीय पुन:नोंद झाल्यानंतर ऑगस्ट २०२० पासून सप्टेंबर २०२० अखेर पर्यंत ११५०० पुस्तकांची ग्रंथ मोजणी पूर्ण झाली आहे.

## साहित्य प्रकारानुसार विषयाची नोंद

संगणकामध्ये पुन:नोंदणी करण्यात आलेल्या ग्रंथांची प्रत्यक्ष नोंद घेऊन बरोबरची खूण करून खात्री करण्यात आली. ग्रंथालयाच्या नियमानुसार वाचकांच्या सोयीसाठी साहित्य प्रकारानुसार विषयांचे वर्गीकरण करण्यात आले. सदर वर्गीकरणाचे काम करीत असताना काही त्रुटी दिसून आल्या त्या ग्रंथपाल मिलिंद दीक्षित यांच्या मार्गदर्शनाने दुरुस्त करण्यात आल्या. ही प्रक्रिया राबवीत असताना जीर्ण झालेले, दाखल नोंद नसलेले अशा स्वरूपाची पुस्तके वेगळी काढण्यात आली.

## ग्रंथांची विषयानुसार रचना (दाखल सिरीज प्रमाणे)

अद्यावत नुतनीकरण झालेल्या ग्रंथालयात काचेच्या पारदर्शी कपाटात साहित्य प्रकाराच्या विषयानुसार आणि विषय क्रमांकानुसार मांडणी करण्यात आली. ही मांडणी करण्यापूर्वी दाखल क्रमांकाच्या सिरीजप्रमाणे ग्रंथ sorting करण्यात आले. वाचकाला ग्रंथ शोधणे सोपे, सुलभ जावेत यासाठी दाखल क्रमांकाच्या सिरीज प्रमाणे रचना करण्यात आली. कपाटांचा क्रमही विषयानुसार घेण्यात आला आहे.



ग्रंथांची प्रत्यक्ष नोंद घेताना



साहित्य प्रकारानुसार विषयांचे वर्गीकरण



कपाटांचा क्रम विषयानुसार लावताना

सदर उपक्रमाची कल्पना व नियोजन सौ. वैशाली सोनगिरे यांचे असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पूर्णत्वास नेण्याचे काम सुरु आहे. या सर्व प्रक्रियेसाठी बालनेत्र सुरक्षा प्रकल्पाच्या चमूचे संस्थेचे विश्वस्त व पदाधिका-यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

## रेऊ वाणी विज्ञान विहाराच्या पर्यावरण पूरक समिती अंतर्गत विविध उपक्रम

रेऊ वाणी विज्ञान विहाराच्या पर्यावरण पूरक समिती अंतर्गत दर वर्षी पर्यावरणाच्या संवर्धन व संरक्षणार्थ विविध उपक्रम राबविले जातात. गणेशोत्सवात होणाऱ्या पर्यावरणाचे प्रदूषण रोखण्यासाठी इकोफ्रेंडली साहित्य वापरून गणपती बनविण्याचे व कागदी डेकोरेशनचे या उपक्रमाअंतर्गत ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले.

### गणपती बनविण्याची कार्यशाळा :-

सदर कार्यशाळेत प्रशासन प्रमुख सौ. वैशाली सोनगिरे यांनी शाडू माती व कुंभाराकडील मातीचा वापर करत विद्यार्थ्यांना गणपती बनविण्याचे ऑनलाईन प्रशिक्षण दिले. या दोन दिवसीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी पहिल्या दिवशी गणपती बनविले व दुस-या सेशन मध्ये घरात उपलब्ध असणाऱ्या साहित्याचा अथवा नैसर्गिकरीत्या बनविलेल्या रंगांचा उदा. हळद, शेंदूर, गुलाल, कुंकू, रंगीत फुले व बाजारात मिळणाऱ्या इकोफ्रेंडली कलरचा वापर करत गणपती रंगविले. या कार्यशाळेत अनेक मुलांनी उत्साहाने सहभाग घेतला व स्वत: बनविलेल्या गणपती बाप्पाची स्थापना देखील आनंदाने केली.



कार्यशाळेत बनविलेले गणपती

### इकोफ्रेंडली कागदी डेकोरेशन कार्यशाळा :-

बालनेत्र सुरक्षा प्रकल्पाच्या ऑप्टोमेट्रीस्ट सौ. मनीषा थोरात व मेडिकल कॉन्सिलर सौ. दिपाली बाविस्कर यांनी लॉकडाऊनच्या कालावधीत विविध प्रकारची कागदी फुले बनविण्याचा सराव करून गणपती डेकोरेशन साठी कार्यशाळा घेतली. त्यात विद्यार्थ्यांना रंगीत क्राफ्ट पेपर, वृत्त पेपर, कार्ड शिट यांचा वापर करून विविध कागदांची फुले, गणपतीची मखर शिकविण्यात आली. या कार्यशाळेत पर्यावरण पूरक गोष्टींचा वापर करून विद्यार्थ्यांनी मखर, फुलदाणी, बुके, विविध फुले बनविली व त्यानेच बाप्पाची सजावटही केली.




कार्यशाळेतील कलाकृती

## मानवी शरीर संस्था व्याख्यान माला

विज्ञान विहारातील विद्यार्थ्यांसाठी मानवी शरीर संस्था या विषयावर PPT मार्फत ऑन लाईन व्याख्यान माला सुरु करण्यात आली आहे. सदर व्याख्यान मालेत पहिले मार्गदर्शन डॉ. दिपाली महाजन यांनी अंतःस्त्रात्वीय ग्रंथी संस्था (Endocrine System) या विषयावर घेतले.




ICSE च्या भैतिक शास्त्राचे ऑनलाईन मार्गदर्शन



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा. व्ही. वाय. दाबके सर

रेऊ वाणी विज्ञान विहारामार्फत इयत्ता १० वी ICSE च्या विद्यार्थ्यांचे भौतिकशास्त्राचे ऑनलाईन मार्गदर्शन झूम सेशनद्वारे घेण्यात आले. त्यात पुर्ण अभ्यासक्रम शिकविण्यात आला. सदर वर्ग माननीय व्ही. वाय. दाबके सरांनी घेतला. दाबके सरांचे सर्व व्याख्याने रेकॉर्डिंग करून ठेवण्यात आलेली आहेत, त्यामुळे भविष्यात या सर्व रेकॉर्डिंगचा विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे.

रेऊ वाणी विज्ञान विहारात सोशल डीस्टंन्ससिंग चे पालन करत इयत्ता १०वी च्या विद्यार्थ्यांच्या प्रयोग वर्गाच्या बॅचेस सुरु आहे. १० विद्यार्थ्यांचा ग्रुप करून त्यांना प्रयोग शिकविला जातो त्यांतर ते स्वतः करून पाहतात. सदर ICSE च्या प्रयोगासाठी आदरणीय दाबके सरांचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थी व विज्ञान विहारातील शिक्षकांना लाभत आहे.



प्रयोग करून दाखवितांना मा. व्ही. वाय. दाबके सर

# का.स.वाणी.मराठी प्रगत अध्ययन संस्था उपक्रम

## प्रा. डॉ. वंदना महाजन यांची मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभाग प्रमुखपदी नियुक्ती

का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेच्या संचालिका व मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागात कार्यरत असलेल्या प्रा. डॉ. वंदना महाजन यांची मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभाग प्रमुख पदी अलीकडेच नियुक्ती करण्यात आली. स्त्रीवादी साहित्य चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग असून अनेक शोधनिबंध त्यांनी सादर केले आहेत.

का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेत गेल्या पाच वर्षांपासून मराठी विषया संबंधित राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर चर्चासत्र, परिषदा यशस्वीपणे घडवून आणल्या आहेत. यांच्या मार्गदर्शनाखाली ६ विद्यार्थ्यांनी मराठी विषयात विद्यावाचस्पती पदवी संपादन केली आहे. प्रा. डॉ. वंदना महाजन यांची मराठी विभाग प्रमुख पदी नेमणूक ही बाब आम्हा सर्वांसाठी अनेक अर्थांनी मोलाची आहे. त्या मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाला निश्चितच एका बौद्धिक उंचीवर घेऊन जातील असा आम्हा सर्वांना विश्वास आहे.

मुंबई विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एक नामवंत विद्यापीठ आहे. अनेक ख्यातकीर्त प्रज्ञावांतनी या विद्यापीठातील मराठी विभागाला ज्ञान व्यवहारातल अग्रस्थान मिळवून दिलेले आहे. यानिमित्ताने संस्थेचे विशस्त, पदाधिकारी व कर्मचारी यांच्यातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!



प्रा. डॉ. वंदना महाजन




## खानदेशचा सांस्कृतिक इतिहास पुनर्लेखन प्रकल्प पहिला खंड मुद्रणाच्या मार्गावर

खानदेशचा सांस्कृतिक इतिहास पुनर्लेखन प्रकल्प पहिला खंड पुनर्मुद्रणाच्या कामाला गती प्राप्त झाली असून ‘खानदेशचा सांस्कृतिक इतिहास’ एकूण खंड सात पैकी पहिला खंड ‘खान्देशातील विविध बोलीभाषा’ या विषयावर प्रसिद्ध होणार आहे. यात डॉ. रमेश सूर्यवंशी, डॉ. फुला बागुल, डॉ. सुधीर देवरे, डॉ. उषा सावंत, डॉ. सविता पटेल, श्री. रवींद्र पांढरे, डॉ. अशोक कोळी इत्यादी प्रमुख लेखकांचा सहभाग असणार आहे.


खानदेश खंडाच्या संपादनाची जबाबदारी प्रमुख संपादक प्रा. डॉ. वंदना महाजन सांभाळत आहेत, तर का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानच्या सचिव मा. प्रा. डॉ. शोभा शिंदे यांचे यथार्थ मार्गदर्शन लाभत आहे. उपरोक्त खानदेशचा पहिला खंड लवकर पुनर्मुद्रणाच्या मार्गावर असल्याचे संस्थेचे संचालक प्रा.डॉ. वंदना महाजन यांनी कळविले आहे.




खंडाचे मुखपृष्ठ

## झूम मिटिंग संपन्न

Covid-19 च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीस सामोरे जात असताना विश्वस्त मंडळाची तिमाहीत घेण्यात येणारी सर्वसाधारण सभा, वित्त मंडळाची बैठक तसेच संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाची बैठक यावेळी देखील दि. २७/०९/२०२० रोजी online संपन्न झाली. का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. शशिकांत धामणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या बैठकीत विविध महत्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. प्रतिष्ठानचे सर्व सन्माननीय विश्वस्त सभेस ऑनलाईन हजर होते. मागील सभेप्रमाणे या सभेस देखील कॅनडाहून मा.श्रीराम (राजू) वाणी यांनी उपस्थिती नोंदवली. सभेच्या शेवटी श्री. जितेंद्र सोनगिरे यांनी सर्वांचे आभार मानले.



सहभागी विश्वस्त

# स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन

## १० सप्टेंबर केअरगिव्हर मीट

डॉ. जगन्नाथ वाणी यांनी १९९७ ला स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन (सा) या संस्थेची स्थापना केली. त्यांनी स्वतः आपल्या मानसिक आजारी पत्नीचे पालकत्व स्वीकारल्या मुळे मानसिक आजाराबद्दल असणारी उदासीनता तसेच मानसिक आजारी व्यक्तीकडे व त्याच्या कुटुंबीयांकडे बघण्याचा समाजाचा नकारात्मक दृष्टिकोन कमी करण्यासाठी प्रयत्न करण्याची त्यांना गरज वाटली. कारण मानसिक आजाराबद्दल जाणीव जागृती झाल्यास हा आजार नियंत्रणात येऊ शकतो व मानसिक आजारी व्यक्तीचे आयुष्य सुरळीत चालू राहू शकते हे डॉ.वाणी यांना जाणवले व त्यांनी 'सा' संस्थेसाठी मोलाची मदत केली. मानसिक आजारी व्यक्ती साठी 'सा' ही संस्था गेली तेवीस वर्षे काम करत आहे तसेच मानसिक आजाराबाबत जाणीव जागृतीसाठी सतत प्रयत्न करत असते. डॉ जगन्नाथ वाणी यांचे मानसिक आरोग्य क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान आहे, त्यांच्या स्मृतीसअभिवादन करून २०१८ पासून 'सा' ही संस्था त्यांच्या जन्मदिनी म्हणजेच १० सप्टेंबर रोजी केअरगिव्हर मीटचे आयोजन करत असते.

केअरगिव्हर मीटला मानसिकआरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ञ व्यक्तींच्या अनुभवाचा फायदा इतरांना व्हावा यासाठी मानसिक आरोग्याबाबत व आजाराबाबत व्याख्यान आयोजित केले जाते. बरेचदा असे दिसते कि आर्थिक समस्या असेल तर बरेच मानसिक आजारी व्यक्ती उपचार घेऊ शकत नाहीत व पैशाच्या अभावी उपचारापर्यंत पोहोचू शकत नाहीत यासाठी त्यांना आर्थिक मदतीची गरज असते व ती मदत त्यांना मिळावी या साठी 'सा' संस्था सतत प्रयत्नशील असते. त्याचाच एक भाग म्हणजे दरवर्षी काही केअरगिव्हर चा सन्मान करून त्यांना आर्थिक मदत दिली जाते. यावर्षी देखील तीन केअरगिव्हर चा सन्मान करण्यात आला. सौ.लतिका फडके, हेमंत मल्लिक, शकुंतला केसरे, यांचा सन्मान करून त्यांना आर्थिक मदत देण्यात आली. तीनही पालकांनी आपले अनुभव कथन केले व केअरगिव्हर म्हणून असणारा प्रवास उलगडला. तर दोन पालकांनी 'सा' संस्था त्यांना कशी मदत करते हे नमूद केले. केअरगिव्हर मीट साठी पालकांचे पालकत्व या विषयावर अमृता जोशी ज्या स्वतः केअरगिव्हर आहेत तसेच डॉक्टर राहूल शिधये जे सायकिॲट्रिस्ट आहेत यांनी व्याख्यान दिले. अमृता जोशी यांनी आपला केअरगिव्हर म्हणून असणारा प्रवास उलगडला. मानसिक आजाराबद्दल समजून घेणे तसेच औषधोपचारांबाबत येणाऱ्या अडचणी व मानसिक आजार उद्भवल्यास काय करायला पाहिजे, हे सांगितले व स्वतःच्या वडिलांच्या मानसिक आजाराबाबत असणारा अस्विकार ते मानसिक आजार स्वीकारण्याबाबतचा प्रवास सांगितला. डॉक्टर राहुल शिधये यांनी पालकांचे पालन हा विषय खूप महत्वाचा आहे हे नमूद केले व त्यासाठी असणारे सहा टप्पे सांगितले. ते म्हणजे, आपण स्वतःची मदत करायला हवी, स्वतःसाठी वेळ देयाला हवा. मानसिक आजारी व्यक्तींनी छोट्या छोट्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्यात व कधी तरी स्वतःच स्वतःचे पालकत्व स्वीकारावे हे नमूद केले. मानसिक आजाराबाबत आजही दिसून येणारा स्टिग्मा आहेच परंतु काही अशा व्यक्ती असतात की ज्या निरपेक्ष भावनेने मदत करत असतात. अशा व्यक्तींचा पालकांनी शोध घ्यावा व स्व-मदत निर्माण करावी. पालक व मानसिक आजारी व्यक्ती यांच्यात संवाद असायला हवा. मानसिकआजारात काम करणाऱ्या 'सा' सारख्या संस्था व विविध उपचार केंद्रे यांची मदत घेऊन कायदेशीर हक्क जाणून घ्यावेत हे नमूद केले.





कार्यक्रमात सहभागी झालेले मान्यवर

## संवेदना




का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानचे माजी संस्थापक विश्वस्त व उन्नती मित्र मंडळाचे अध्यक्ष, माजी नगराध्यक्ष काकासाहेब चंद्रकांत केले यांच्या सहचारिणी कै.सौ.लताताई केले यांना शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२० रोजी अल्पशा आजारामुळे देवाज्ञा झाली. त्या अत्यंत धार्मिक वृत्तीच्या, मनमिळावू, सेवाभावी हसतमुखं व अजातशत्रू होत्या त्यांना सतत कार्यमग्न राहणे आवडत असे. त्यांच्या जाण्याने केले परिवारात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. केले परिवाराच्या दु:खात का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठानचे विश्वस्त मंडळ व संस्थेचे सर्व कर्मचारी सहभागी आहोत. त्यांच्या आत्म्यास चीर:शांती लाभो व त्यांना सद्गती प्राप्त होओ ही ईश्वर चरणी प्रार्थना व भावपूर्ण श्रद्धांजली !

## वाचकांच्या निवडक प्रतिक्रिया



**News letter Volume - 9** वाचून देशविदेशातील मान्यवर वाचकांच्या उत्स्फूर्तपणे प्रतिक्रिया प्राप्त झाल्याबद्दल आभार.

- Ujwal Kele, Pune – It is really worth noting that in spite of the lockdown and other restrictions, various activities were undertaken and completed by the Trust and other institutions. Tremendous efforts have been taken by all the team members. Congratulations to the entire team! Keep it up

- Dr. A N Chikate - Thanks for sending your News Bulletin, Congrats.
  Thank you so much Sir.

**We accept donation from well-wishers**

Bank Current Account No. 10410684138
IFSC Code SBIN 0001938
State Bank of India, Pramod Nager Branch,
Deopur, Dhule (Maharashtra)

Reg.No. K.S. Wani Memorial Trust.No.E352/Dhule
FCRA Reg.No. 083820024R
PAN No. AAATK9880K


**Contact:** K. S. Wani Memoral Trust, Unnati Nager
Nakane Road Deopur Dhule- 424002
(02562)223654, 9372810477
Email Id: kswmarathi@gmail.com
Please Visit: www.kswtrust.org